प्लाझमोडियम फाल्सीपेरम जुनकीय रचेत बदल झाल्याने औषधी निष्प्रभ

- राज्यात ५ वर्षांत ९२ हजार जणांना मलेरियाचा डंख
- ११४ जणांचा मृत्यू

कोल्हापूर : आशिष शिंदे

मलेरियासाठी कारणीभूत ठरणारा प्लाझमोडियम फाल्सीपेरम हा परजीवी स्वतःच्या जुनकीय रचनेत बदल करुन औषधांना चकवा देत असल्याचे संशोधनातून समोर आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, राज्यात गेल्या पाच वर्षांत ९२ हजार ४३८ जणांना मलेरियेची लागण झाली असून ११४ जणांचा मलेरियामुळे मृत्यू झाला आहे. या रुग्णवाढीस डासांच्या प्रादुर्भावासह



परजीवींमधील जनुकीय बदल कारणीभूस असल्याची भीती तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

मलेरियाचे रुग्ण ९७ टक्क्यांनी कमी झाले, तेव्हा परजीवींच्या संख्येवर प्रचंड दबाव आला. अशा स्थितीत स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी या परजीवींमध्ये जेनेटिक बॉटलनेक ही प्रक्रिया घडली. यामुळे

जागतिक हिवताप दिन विशेष

त्यांच्यातील जनुकीय विविधता घटली असून, केवळ असेच परजीवी शिल्लक राहिले आहेत ज्यांच्यावर सध्याच्या औषधांचा परिणाम होत नाही. विशेषतः केल्च १३ - आर ५६१ एच नावाच्या एका विशिष्ट जनुकीय म्युटेशनमुळे हा परजीवी सर्वात प्रभावी औषधालाही जुमानत नसल्याचे संशोधनातून समोर आले आहे. अमेरिकेतील टेक्सास बायोमेडिकल रिसर्च इन्स्टिट्यूट आणि थायलंड, म्यानमार मधील शोक्लो मलेरिया रिसर्च युनिट यांचा संयुक्त अभ्यासातून ही माहिती समोर आली आहे.

> मलेरियावर मात करण्यासाठी क्लोरोक्विन आणि आर्टेमिसिनिन ही प्रभावी औषधे उपलब्ध आहेत. मात्र, आजार पूर्णपणे बरा होण्यासाठी उपचारांचा कालावधी पूर्ण करणे आवश्यक आहे. कोणताही ताप हा हिवताप असू शकतो, त्यामुळे ताप अंगावर न काढता तातडीने तपासणी करून घ्यावी. सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये मलेरियाच्या चाचण्या आणि उपचार पूर्णपणे मोफत दिले जातात.
>
> **- डॉ. विनोद मोरे,**
> जिल्हा हिवताप अधिकारी

आरोग्य यंत्रणेसमोर नवे आव्हान

राज्यातही मलेरियाच्या परजीवींच्या जुनकीय रचनेत बदल झाले आहेत का याचा स्वतंत्र अभ्यास करण्याची गरज आहे. केवळ डास निर्मूलनावर भर न देता, परजीवींच्या जुनकीय रचनेवर लक्ष ठेवणे अनिवार्य आहे. जर या स्मार्ट परजीवींचा प्रसार रोखला नाही, तर भविष्यात साध्या मलेरियावर उपचार करणेही कठीण होऊ शकते, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

राज्यातील मलेरियाची रुग्णसंख्या

वर्ष	रुग्णसंख्या	मृत
२०२१-२२	१९,७७०	१५
२०२२-२३	१४,५३३	२३
२०२३-२४	१६,७६०	२३
२०२४ - २५	२०,६४०	२६
२०२५-२६	२०,७३५	२७

भोंदू खरातला पुन्हा ३ दिवस पोलिस कोठडी

विशेष तपास पथकाने या प्रकरणात घेतला ताबा

नाशिक : पुढारी वृत्तसेवा

दैवी शक्तीच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण केल्याच्या गंभीर आरोपांमध्ये अडकलेल्या भोंदू अशोक खरातला याला सहाव्या गुन्ह्यात न्यायालयाने ३ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. त्यामुळे खरातला आणखी काही काळ पोलिस कोठडीत राहावे लागणार आहे. विशेष तपास पथकाने या प्रकरणात त्याचा ताबा घेतला असून, २६ एप्रिलपर्यंत कोठडी देण्याचा आदेश न्यायालयाने दिला.

खरातवर आतापर्यंत तब्बल १२ गुन्हे दाखल असून, विविध महिला अत्याचार प्रकरणांमध्ये त्याच्यावर गंभीर आरोप आहेत. यापूर्वीच्या गुन्ह्यातील पोलीस कोठडी संपल्यानंतर त्याला आज व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे न्यायालयात हजर करण्यात आले. दरम्यान, कॅनडा कॉर्नर परिसरातील कार्यालयात एका महिलेला गुंगीचे औषध देऊन आणि पेढा खाऊ घालून तिच्यावर अत्याचार केल्याचा गंभीर गुन्हा त्याच्यावर दाखल आहे.

आणखी खुलासे होणार?

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने हा गुन्हा गंभीर स्वरूपाचा असल्याचे नमूद करत तपासासाठी आरोपी खरातचा ताबा आवश्यक असल्याचे मान्य केले. पुढील तपासात आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

भोंदू खरातचा मुलगा हर्षवर्धनची पुन्हा चौकशी

भोंदू अशोक खरात प्रकरणात तपासाचा फास आणखी घट्ट होत असून त्याचा मुलगा हर्षवर्धन खरात याची विशेष तपास पथकाने पुन्हा चौकशी केली आहे. मालमत्तेचे व्यवहार आणि इतर आर्थिक बाबींसंदर्भात ही चौकशी करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. यापूर्वीही त्याची चौकशी करण्यात आली होती, मात्र, तीन तासांच्या चौकशीनंतर त्याला सोडण्यात आले होते.

डीसीए संचालक केदार रहाणे यांना मानसशास्त्र विषयात पीएच.डी.

छत्रपती संभाजीनगर : येथील नामांकित सैनिकी प्रशिक्षण संस्था 'डिफेंस करिअर अॅकॅडमी' (डीसीए) सैनिक स्कूलचे संचालक तथा डिफेन्स करिअर कोच केदार रहाणे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने मानसशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे.

रहाणे यांनी 'इम्पॅक्ट ऑफ माईंड मॅपिंग प्रोग्राम्ड इन लर्निंग अमंग IX क्लास स्टुडंट्स्' या विषयावर आपले संशोधन पूर्ण केले. इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रक्रियेवर 'माईंड मॅपिंग'चा काय परिणाम होतो, याचा सखोल अभ्यास त्यांनी या प्रबंधातून मांडला आहे. या संशोधनासाठी त्यांना डॉ. रवींद्र शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. १० एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या परीक्षेनंतर विद्यापीठाने त्यांना अधिकृतपणे ही पदवी जाहीर केली.

शिक्षण व सैनिकी प्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत केदार रहाणे यांनी आजवर हजारो युवक-युवतींना भारतीय सैन्यात अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यास मदत केली आहे. त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन २०२१ मध्ये 'कॉमनवेल्थ व्होकेशनल युनिव्हर्सिटी'ने त्यांना मानद डॉक्टरेट देऊन गौरविले होते. या यशाबद्दल त्यांचे वडील सोमनाथ रहाणे, आई यमुनाबाई रहाणे, डीसीए गर्ल्स विंगच्या संचालिका ऊर्मिला रहाणे, सचिव सच्चिदानंद रहाणे यांच्यासह उद्धव टकले, कर्नल अरुण झा, सुभाष धवन, श्रीकांत वरुडे, शशिकांत बडाख आणि सुनील जाधव यांनी अभिनंदन केले आहे.

जुन्या 'शक्तिपीठ'वर आधीच जमिनी घेऊन पैसे लाटण्याचे मनसुबे फसले

राजकीय नेते, अधिकारी ते भोंदू खरातपर्यंत सर्वांचे स्वप्न धुळीस

सोलापूर : सुमित वाघमोडे

नागपूर ते गोवा शक्तिपीठ महामार्गातून कोट्यवधी रुपये कमाविण्यासाठी राजकीय नेते, उद्योगपती सोबतच लिंगपिसाट अशोक खरातसारखे भोंदूबाबादेखील पुढे आले असल्याचे उघड झाले आहे. हा महामार्ग कुठून जाणार होता, याची माहिती अगोदर मिळवून त्या मार्गावरील जमिनी स्वस्त दराच आधीच खरेदी करून ठेवल्याचे उघड झाले आहे. परंतु, महामार्गात बदल झाल्याने अनेकांचे कोट्यवधी रुपये लाटण्याचे मनसुबे धुळीस मिळाले.

पुढारी विशेष

सोलापूर जिल्ह्याचा विचार करता बार्शी, उत्तर सोलापूर, मोहोळ, पंढरपूर व सांगोला तालुक्यातून जाणारा शक्तीपिठाचा जुना मार्ग आता बदलला आहे. बार्शीतून थेट माढा, पंढरपूर, माळशिरस या तालुक्यातून आता नवा मार्ग जाणार आहे. शक्तीपिठाचा जुना मार्ग उत्तर सोलापूर तालुक्यातील कळमण येथून जात असल्याचे माहीत झाल्याने भोंदू अशोक खरात, माजी आमदार दीपक साळुंखे- पाटील, परिवहनचे माजी अधिकारी बजरंग खरमाटे यांच्यासह उद्योगपती ओसवाल यांनी येथे जमिनी खरेदी केल्या. परंतु, तेथून जाणारा मार्ग बदलण्यात आल्याने त्यांच्या अपेक्षांवर पाणी फिरले. अशोक खरात याचे नाव आल्याने हे प्रकरण बाहेर आले. त्यामध्ये अनेकांची नावे निष्पन्न झाली. या नावांव्यतिरिक्त शक्तीपिठाच्या जुन्या मार्गावर अनेक राजकीय नेत्यांनी, प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जमिनी घेतल्याची चर्चा आहे. त्यामुळेच काही अधिकाऱ्यांनी शक्तिपिठाचा मार्ग बदलण्यास विरोध केला असल्याचा गौप्यस्फोट काही दिवसांपूर्वी सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केला आहे. सोलापुरात अनेक अधिकाऱ्यांनी दुसऱ्यांच्या नावे या जमिनी खरेदी केल्या आहेत. शक्तीपिठाचा मार्ग बदलण्यास विरोध झाल्यानंतर राज्य शासनाने याची दखल घेत कोणकोणत्या अधिकाऱ्यांनी कुणाच्या नावावर जमिनी घेतल्या याचा तपास सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले.

नव्या मार्गावरही घेतल्या जमिनी

नव्याने झालेल्या मार्गावरही अनेकांनी जमिनी खरेदी केल्याची चर्चा सोलापुरात सुरू आहे. पंढरपूर, माळशिरस तालुक्यातील शेतजमिनींना प्रचंड दर मिळत असल्याने तेथे या जमिनी घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली. यातून जादा पैसे मिळवण्याच्या हेतूने या जमिनीवर दोन ते तीन वर्षांपासून फळबाग असल्याची नोंदही करण्यात आली आहे.

या मार्गाने दिला धक्का

बार्शी : गौडगाव, रुई, निंबळक, मुंगशी, मालेगाव, रातंजन, लाडोळे, सर्जापूर, सासुरे, वैराग, ढोराळे, तडवळे, यावली.

माढा : धानोरे, मानेगाव, यावली, उंदरगाव, विठ्ठलवाडी, उपळाई खुर्द, उपळाई बुद्रुक, रोपळे खुर्द, बावी, सोलंकरवाडी, अरण, मोडनिंब, तुळशी.

पंढरपूर : करकंब, नेमतवाडी, पेहे, नांदोरे, आव्हे.

माळशिरस : नेवरे, जांबूड, विठ्ठलवाडी, माळखांबी, बोंडले, उघडेवाडी, वेळापूर, निमगाव, चांदापुरी, मगरवाडी, गारवाड.

जुन्या मार्गावर जमीन खरेदी

बार्शी : गौडगाव, रातंजन, मालेगाव, अंबाबाईचीवाडी, आंबेगाव, जवळगाव, हत्तीज, चिंचखोप, शेळगाव.

उत्तर सोलापूर : कौठाळी, कळमण, पडसाळी

मोहोळ : मसले चौधरी, खुनेश्वर, भोयरे, घाटणे, हिगणी निपाणी, मोहोळ शहर, पोखरापूर, तांबोळे, सौंदणे, टाकळी सिकंदर

पंढरपूर : फुलचिंचोळी, पुळूज, विठे, खरसोळी, पोहरगाव, आंबे, रांझणी, अनवली, कासेगाव, खर्डी, शेटफळ, तपकिरी,

सांगोला : मेथवडे, संगेवाडी, मांजरी, देवकतेवाडी, चिंचोळी, बामणी, एखतपूर, कमलापूर, यलमार, मंगेवाडी, अजनाळे, चिणके, वझरे, बलवडी, नाझरे, चोपडी, बंडगरवाडी, सोमेवाडी.

महाबळेश्वर : प्रसिद्ध वेण्णालेक येथे नौकाविहारासाठी पर्यटकांची झुंबड उडत आहे.

उन्हाळी हंगामामुळे पर्यटकांनी बहरले महाबळेश्वर, पाचगणी

वेण्णालेक, विविध पॉईंट्स्, बाजारपेठ गर्दीने फुल्ल

१ उकाडा सुसह्य करण्यासाठी महाबळेश्वरमध्ये गर्दी.

२ वेण्णा लेक व विविध पॉईंट्स्वर वाढली, वर्दळ तापोळा, पाचगणी परिसरातही पर्यटनाला चांगला प्रतिसाद

३ स्थानिक व्यवसाय आणि खरेदीला चालना

महाबळेश्वर : प्रेषित गांधी

देश-विदेशातील पर्यटकांचे आवडते पर्यटनस्थळ असलेल्या महाबळेश्वर येथे उन्हाळी सुट्ट्यांमुळे पर्यटनाला जोरदार बहर आला आहे. राज्यात उष्णतेची तीव्रता वाढली असताना महाबळेश्वरमध्ये मात्र आल्हादायक गारव्याचा अनुभव पर्यटक घेत आहेत. महाबळेश्वरबरोबरच पाचगणी, तापोळा ही पर्यटनस्थळेही गजबजून गेली आहेत.

महाबळेश्वरमध्ये वेण्णा लेक येथे नौकाविहारासाठी पर्यटकांची रांग लागत असून, ऑर्थरसीट पॉईंट, लॉडविक पॉईंट, मुंबई पॉईंट येथेही पर्यटकांची रेलचेल वाढली आहे. महाबळेश्वर मंदिर व प्रतापगड किल्ला येथेही भाविक व पर्यटक मोठ्या संख्येने भेट देत आहेत. जवळील पाचगणतही सिडनी पॉईंट, पारसी पॉईंट, टेबल लँड परिसरात पर्यटकांची वर्दळ वाढली आहे.

वाल्मीक कराडला बीडच्या जेलमध्ये व्हीआयपी सुविधा

कैद्याची क्लिप व्हायरल

बीड : गेल्या काही दिवसांपासून बीडच्या तुरुंगातील कैद्यांचे संभाषण चांगलेच व्हायरल झाले आहे. संतोष देशमुख हत्याप्रकरणात अटकेत असलेल्या वाल्मीक कराड आणि गँगकडून इतर कैद्यांना धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप होत आहे. त्याचअनुषंगाने सलग दोन दिवस अझहर पठाण नामक कैद्याची कॉल रेकॉर्डिंग व्हायरल झाली होती. आता आणखी एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली असून, कराडला जेलमध्ये व्हीआयपी सुविधा मिळत असल्याचे यातून उघड झाले.

बीड कारागृहात कैदी असलेल्या सनी आठवले याची कॉल रेकॉर्डिंग व्हायरल झाली असून, वाल्मीक कराडचा जेलमध्ये दबदबा असल्याचे त्याने म्हटले. तसेच, अजहर पठाणवर दबाव आणत आहेत, त्याला मारहाण झाली, त्याचा खुबा उपसला, असेही तो सांगतो. या संदर्भात सखोल चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी त्याने या कॉल रेकॉर्डिंगमधून केली आहे.

आजदिनांक

पंचांग

सूर्योदय : ६.११, **सूर्यास्त :** ६.५४, **चंद्रोदय :** १.३३, **चंद्रास्त :** १.५७, **मास :** वैशाख, **पक्ष :** शुक्ल, **तिथी :** नवमी, **नक्षत्र :** आश्लेषा, **शुभ काळ (अभिजित मुहूर्त) :** १२.०८ ते १२.५६, **राहू काळ :** ९.२१ ते १०.५७, **यमगंड :** ६.११ ते ७.४६, **यमघंट :** २.०७ ते ३.४३.

दिनविशेष २५ एप्रिल २०२६

- जागतिक मलेरिया दिन
- १८७४ : रेडिओचे संशोधक गुग्लिएल्मो मार्कोनी यांचा जन्म
- १९१८ : हिंदी व मराठी चित्रपट अभिनेते शाहू मोडक यांचा जन्म
- १९४० : हॉलीवूडमधील अभिनेता अल पचिनो यांचा जन्म

राशिभविष्य

मेष : निर्णय घेण्याची वेळ येईल, पण घाई टाळा. कामात नवीन दिशा दिसेल. आर्थिक संतुलन राखा. संध्याकाळी मनःशांती मिळेल.

वृषभ : नातेसंबंधांमध्ये संवाद महत्त्वाचा ठरेल. कामात सातत्य ठेवल्यास यश मिळेल. अनपेक्षित खर्च संभवतो. कुटुंबासोबत वेळ घालवा.

मिथुन : नवीन संधी दारात येतील. बुद्धिमत्तेचा योग्य वापर करा. प्रवासाचे योग संभवतात. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका.

कर्क : भावनिक निर्णय टाळणे फायदेशीर ठरेल. घरगुती कामात व्यस्त राहाल. जुन्या मित्रांची भेट होईल. धनलाभ होईल.

सिंह : आत्मविश्वास वाढलेला जाणवेल. नेतृत्वाची संधी मिळेल. कामात कौतुक होईल. नवीन योजना यशस्वी होतील.

कन्या : योजना आखून काम केल्यास लाभ होईल. कागदोपत्री कामात यश मिळेल. नातेवाईकांकडून मदत मिळेल.

तूळ : संतुलन राखणे आवश्यक आहे. व्यवसायात नवीन कल्पना सुचतील. जोडीदारासोबत वेळ घालवा. मन प्रसन्न राहील.

वृश्चिक : गुप्त गोष्टी उघड होण्याची शक्यता आहे. कामात लक्ष केंद्रित करा. आर्थिक फायदा होईल. तणावावर नियंत्रण ठेवा.

धनु : प्रवासाचे योग अनुकूल आहेत. शिक्षणात प्रगती होईल. नवीन ओळखी वाढतील. आत्मविश्वास टिकवा.

मकर : जबाबदाऱ्या वाढतील. कामात प्रामाणिकपणा फायदेशीर ठरेल. आर्थिक स्थिती सुधारेल. कुटुंबाचा आधार मिळेल.

कुंभ : नवीन कल्पना प्रत्यक्षात आणा. मित्रांकडून सहकार्य मिळेल. कामात गती येईल. आरोग्य चांगले राहील.

मीन : सर्जनशीलतेला वाव मिळेल. मनातील विचार व्यक्त करा. धनलाभाचे संकेत आहेत. दिवस समाधानकारक जाईल.

गुगल ट्रेंडस्

- राज्यसभेचे खासदार राघव चड्ढा हे 'आप'च्या तीन आमदारांसह भाजपमध्ये प्रवेश केल्याची बातमी ट्रेंडिंग होती.
- अन्नू कपूर यांचे ओमपुरीबाबतचे वक्तव्य चर्चेत होते.
- इराणचे सर्वोच्च नेते मोज्तबा खामेनी यांच्याविषयीच्या बातम्या ट्रेंडिंग होत्या.
- तामिळनाडू, पश्चिम बंगालमधील मतदानाबाबतच्या बातम्या ट्रेंडिंग होत्या.

वागदारी ट्रान्समिशन लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय - बीयू.५ए एसएफएस फ्लॅट्स, इन्कम टॅक्स कॉलनी जवळ, आउटर रिंग रोड, पीतमपुरा, दिल्ली ११००३४

CIN- U42201DL2025GOI450109

सार्वजनिक सूचना

वागदरी ट्रान्समिशन लिमिटेडच्या

पारेषण परवाना मंजुरी अर्जावर (प्रकरण क्र. ६२/२०२६) सूचना/हरकती आमंत्रित

१. वागदारी ट्रान्समिशन लिमिटेड पारेषण मंजुरीसाठी अर्ज दाखल केला आहे परवाना आधी महाराष्ट्र वीज नियामक कमिशन खाली विद्युत कायदा, २००३ च्या कलम १४ आणि १५ आणि एमईआरसी (पारेषण परवाना अटी) नियम, २००४ च्या तरतुदींनुसार. माननीय आयोगाने २२ एप्रिल २०२६ रोजी अर्ज दाखल करून घेतला आहे आणि वागदारी ट्रान्समिशन लिमिटेडला विद्युत कायदा, २००३ च्या कलम १५(२) अंतर्गत सार्वजनिक सूचना प्रकाशित करण्याचे निर्देश दिले आहेत.

२. नवीकरणीय ऊर्जा (RE) विजेच्या वहनातील अडथळे दूर करण्यासाठी आणि वहन क्षमता वाढवण्यासाठी, वागदारी ट्रान्समिशन लिमिटेडची स्थापना आंतर–राज्यीय पारेषण प्रणाली मजबूत करण्याकरिता एक विशेष उद्देश वाहन (विशेष उद्देश वाहन) म्हणून करण्यात आली आहे. याअंतर्गत ४००/२०० केव्ही एआयएस वागदारी (जि. सोलापूर) तसेच अनेक सर्किट्सवर संबंधित लाईन्स आणि बेजची व्यवस्था स्थापित केली जाईल . प्रकल्प आहे झाले पुरस्कार प्रदान केला माध्यमातून दर महाराष्ट्र शासनाने निविदा प्रक्रिया समन्वयक म्हणून अधिसूचित केलेल्या पीएफसी कन्सल्टिंग लिमिटेडद्वारे आयोजित स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया.

३. प्रकल्पात खालील बाबींचा समावेश आहे

अ. क्र.	पारेषण योजनेची व्याप्ती	प्रभावी तारखेपासून नियोजित COD	प्रकल्पाच्या घटकाच्या नियोजित COD वर वसूल करण्यायोग्य उद्धृत पारेषण शुल्काची टक्केवारी	संबंधित घटकाच्या व्यावसायिक कार्यान्वयनाची (सीओडी) घोषणा करण्यासाठी पूर्व. आवश्यक असलेले घटक
१.	३X५०० MVA, ४००/२२० kV ICT आणि ४०० kV पातळीवर १X१२५ MVAr बस रिॲक्टरसह AIS वागदारीची स्थापना. • ४०० / २०० केव्ही, ५०० एमव्हीए, आयसीटी - ०३ नग. • १२५ MVAr, ४०० kV बस अणुभट्टी – १ क्र • ४०० केव्ही लाईन बे - ०४ नग. • ४०० केव्ही आयसीटी बे - ०३ नग • ४०० केव्ही बस रिॲक्टर बे– ०१ नं. • २२० केव्ही लाईन बे – ०४ नग. • २२० केव्ही आयसीटी बे – ०३ नग. **भविष्यातील अवकाश तरतुदी -** • १X५०० एमव्हीए ४००/२२० केव्ही आयसीटीची स्थापना • ४००/२०० केव्ही, ५०० एमव्हीए, आयसीटी – ०१ नं. • ४०० केव्ही आयसीटी बे – ०१ नं. • २२०केव्ही आयसीटी बे – ०१ नं.	एसपीव्ही हस्तांतरणापासून २४ महिने	१००%	योजनेच्या सर्व घटकांचे एकाच वेळी कार्यान्वयन करणे आवश्यक आहे, कारण त्यांचा वापर एकमेकांच्या कार्यान्वयनावर अवलंबून आहे.
२.	४०० केव्ही एआयएस वागदरी (नवीन) ते ७६५ केव्ही एआयएस पुणे (पूर्व) पर्यंत ४०० केव्ही डी/सी लाईन (प्रस्तावित) • ४०० केव्ही, ६३ एमव्हीएआर स्विच्ड लाइन रिॲक्टर ४०० kV AIS वागदारी–०२ Nos वर • ४०० केव्ही, ५० एमव्हीएआर स्विच्ड लाइन रिॲक्टर ७६५ केव्ही एआयएस पुणे (पूर्व) येथे (प्रस्तावित) – ०२ नग • ७६५ केव्ही एआयएस वर ४०० केव्ही एआयएस लाइन बे पुणे (पूर्व) (प्रस्तावित) – ०२ नग			
३.	४०० केव्ही एआयएस वागदरी (नवीन) पासून ४०० केव्ही सोलापूर पूलिंग स्टेशन (सेक्टर–०२) पर्यंत ४०० केव्ही डी/सी लाईन • ४०० केव्ही सोलापूर येथील ४०० केव्ही लाईन बे पूलिंग स्टेशन (सेक्टर–२) – ०२ नग			
४.	४०० kV AIS वागदारी (नवीन) पासून २२० kV AIS वागदारी (प्रस्तावित) पर्यंत २२० kV D/C लाइन • २२० केव्ही एआयएस लाइन बेज २२० केव्ही वर एआयएस वागदारी (प्रस्तावित) – ०२ नग			
५.	४०० केव्ही एआयएस वागदारी येथे सौर जनित्रांसाठी ४०० केव्ही लाईन बेची स्थापना. • ४०० केव्ही लाईन बे – ०४ नग			
६.	वागदारी येथील ४०० केव्ही एआयएस येथे सौर जनित्रांसाठी २२० केव्ही लाईन बेची स्थापना. • २२० केव्ही लाईन बे – ०४ नग			
७.	४०० केव्ही एआयएस वागदारी (नवीन) पासून २२० केव्ही एआयएस नारंगवाडी (विद्यमान) पर्यंत २२० केव्ही डी/सी लाईन. • २२० केव्ही एआयएस लाइन बेज २२० केव्ही वर एआयएस नारंगवाडी (विद्यमान) – ०२ नग			

४. टॅरिफ आधारित स्पर्धात्मक बोली (टीबीसीबी) प्रक्रियेनुसार यशस्वी बोलीदाराने अर्जदाराचे अधिग्रहण केले असून, महाराष्ट्र राज्यात सदर आंतर–राज्य पारेषण प्रणालीची स्थापना, संचालन आणि देखभालीसाठी पारेषण परवाना मिळवणे आवश्यक आहे. त्यानुसार, वागदारी पॉवर ट्रान्समिशन लि. ने पारेषण परवाना मिळवण्यासाठी माननीय आयोगासमोर ही याचिका दाखल केली आहे.

५. कमिशन आहे दिग्दर्शित वागदारी संसर्ग मर्यादित प्रसारण परवानगीसाठीच्या अर्जावर जनतेकडून सूचना/आक्षेप मागवणे परवाना माध्यमातून हे सूचना. संपर्क तपशील च्या नोडल व्यक्ती ज्यांच्याकडून अर्जाची प्रत तपासणी किंवा खरेदीसाठी मिळवता येईल, त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत:

a. **नाव** : श्री. विनोद कुमार

b. **अर्जाची प्रत पाहणी किंवा खरेदीसाठी मळिवण्याचा पत्ता** : केसीसी बिल्डकॉन प्रायव्हेट लिमिटेड, ८ मजला, टॉवर–ए, एम३एम अर्बाना बिझनेस पार्क, सेक्टर ६७, गुरुग्राम, हरियाणा १२२००१

c. **तपासणी किंवा खरेदीची वेळ**: कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:०० ते सायंकाळी १७:०० च्या दरम्यान

d. सविस्तर अर्ज कागदपत्रे (इंग्रजीमध्ये) ₹१००/- रोख किंवा DD / चेकद्वारे भरल्यावर CD सोबत वागदारी ट्रान्समिशन "मर्यादित" देय रक्कम नवी दिल्ली येथे देय आहे.

e. ज्या वेबसाईटवरून अर्जाची प्रत विनामूल्य डाउनलोड करता येईल, त्या वेबसाईटचा पत्ता : https://kccbuildcon.co.in/

६. प्रकाशित केलेल्या सार्वजनिक सूचनेला प्रतिसाद म्हणून, ज्या कोणालाही सूचना/आक्षेप नोंदवायचे आहेत, ते इंग्रजी किंवा मराठी भाषेत लेखी स्वरूपात अपलोड करून सादर करू शकतात. 'ई–सार्वजनिक सल्लामसलत' MERC वेबसाइटवरील टॅब (www.merc.gov.in/e-public-consultation). हे वैशिष्ट्य वापरण्यात काही अडचण आल्यास, संबंधित हितधारकांनी संपर्क साधावा . कॅन संपर्क मर्क कार्यालय वर मोबाईल क्रमांक : ८९२८०७३५२२ किंवा वर ईमेल आयडी: सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० च्या दरम्यान suggestions@merc.gov.in वर पाठवा .

७. ज्या व्यक्तीने सूचना आणि आक्षेप अपलोड केले आहेत 'ई–सार्वजनिक सल्लामसलत' टॅबने त्याच्या सबमिशनची कोणतीही हार्ड कॉपी दाखल करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तीकडे इलेक्ट्रॉनिक सुविधा नाही माध्यमे कॅन फाइल त्यांचे सूचना आणि आक्षेप मध्ये अ कठीण प्रत यांना उद्देशून **'सचिव', महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एम ईआरसी), १३ वा मजला, सेंटर नं. १, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई-४००००५, सोबत श्री. डी. के. वालेचा, केसीसी बिल्डकॉन प्रा. लि., (सीओओ, केसीसी बिल्डकॉन प्रा. लि., ८ वा मजला, टॉवर-ए, एम३एम अर्बाना बिझनेस पार्क, सेक्टर ६७, गुरुग्राम, हरियाणा १२२००१, ईमेल: dkvalecha@kccbuildcon.co.in)** यांच्यावर नोटीस बजावल्याचा पुरावा. पाहिजे वाहून नेणे प्रेषकाचे पूर्ण नाव, टपालाचा पत्ता आणि ईमेल पत्ता (असल्यास). यानंतर प्राप्त झालेल्या सूचना आणि / किंवा आक्षेप **१७:०० वाजता २५ मे २०२६ रोजी** विचारात घेतले जाणार नाही. इतर कोणत्याही माध्यमातून दाखल केलेल्या सूचना/आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

८. वागदारी ट्रान्समिशन लिमिटेड प्रत्येक आक्षेपाला/टिप्पणीला उत्तर देईल. तीन दिवसांच्या आत मिळाले च्या त्याची पावती पण नाही नंतर पेक्षा **२८ मे २०२६ २५ मे २०२६** पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व आक्षेपांसाठी/टिप्पण्यांसाठी .

एसडी /-

देवेंद्र कुमार वालेचा,

सीओओ (प्रशिक्षण आणि विकास)

ठिकाण : दिल्ली

दिनांक : २५.०४.२०२६

जाहीर लिलाव

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा करपरावाडी तालुका राहुरी जि. अहिल्यानगर या शाळेच्या दोन वर्ग खोल्यांचे निर्लेखन मंजूर झाले असल्याने सदर वर्ग खोल्यांचा आहे त्या स्थितीत मंगळवार दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी जाहीर लिलाव आयोजित केला आहे. ज्या व्यक्ती किंवा संस्थांना लिलावात सहभाग घ्यायचा आहे त्यांनी खालील क्रमांकावर संपर्क करावा लिलावाच्या अटी व शर्ती मुख्याध्यापक कार्यालयात वाचावयास मिळतील.

श्री. संजय रघुनाथ साबळे

(अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती करपरावाडी. ता. राहुरी, जि. अहिल्यानगर)

श्री. रविकिरण साळवे

(सचिव, शाळा व्यवस्थापन समिती करपरावाडी. ता. राहुरी, जि. अहिल्यानगर)

संपर्क क्रमांक - **9420807347**

महावितरण महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

वीज बंद निवेदन

अहिल्यानगर शहर तथा ग्रामीण विभागामध्ये दुरुस्ती व देखभालीच्या कामासाठी खालील परिसराचा वीज पुरवठा खालील वेळेत बंद असणार आहे,तरी ग्राहकांनी सहकार्य करावे. वीज पुरवठा बंद असणारा भाग–

दि. २५/०४/२०२६ रोजी ०९:०० ते १८:०० – अहिल्यानगर शहरातील व तालुक्यातील मल्हार चौक, शिवनेरी चौक, आगरकर मळा, तेलीखुंट, कापड बाजार, माळीवाडा कोट गल्ली, अमरधाम, कल्याण रोड, माणिक चौक, शनी चौक, तपोवन रोड, पाईपलाई रोड, डॉन बॉस्को, वडगाव गुप्ता, निर्मल नगर, हुडको, पवन नगर, कादंबरी नगरी, L Block व D Block MIDC विळद, देहरे, शिंगवे, नानदगाव, गवळीवाडा, रुई छत्तीशी उपकेंद्र शिराढोण, वडगाव तांदळी, रुई छत्तीशी, अंबीलवाडी, मठपिंपरी, राळेगण, हातवळण, दहीगाव साकत व आसपासचा परिसर,

पारनेर तालुक्यातील पिंपरी गवळी, विसापूर, पिंपळगाव व आसपासचा परिसर

कार्यकारी अभियंता (शतग्रा),

म रा वि वि कं मर्या, अहिल्यानगर

PRO NO (133/2026)